देवाने सांगितले,
“नाही मी निष्ठूर, नाही मी निर्दयी
सगळ्यांच्या प्रति, आहे मी सदा दयनीय...
नाही मी कठोर, नाही मी कडक
जरी दगडाचा करशी मज, तरी मातीहून नरम...
नाही समजत मला, तुझे कपट आणि लबाडी
आचरणात समोर गोडी नि पाठीमागे खोडी ...
मानवा तुझ्या मनीचा भाव कळतो, मला तरी
वाणी-वर्तनात नसलेला ताळमेळ, संभ्रमात पाडतो...
कठोर तपश्चर्या नसली तरी चालते,
निर्मळ भाव मला आकर्षित करून घेतो...
चांगले नाही केले तरी, वाईट मात्र करू नको,
दुसऱ्याचे वाईट करू नये,  स्वतःचे वाईट होऊ देऊ नये...
नको मला तुझी पूजा, नको मला तुझी सेवा
तुझ्या विविध  कर्माचा  तू, काळानुसार खा मेवा...
काळाला देवून धनाचे रूप, ठरवला त्याला मोठा
माझ्या अदृश्य अस्तित्वाला, ठरवतोस ना खोटा…
शक्ती  दिसत नाही वापराशिवाय समजत नाही
तू मात्र माझा आहे, हे मी कधी विसरत नाही…
तरीही तुझ्या मर्जीनुसार मी तुझ्यासोबत असतो
फक्त तुझ्या  कर्म  बंधनाने  मी  दुरावला  जातो...”